# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह

**महासभा दि. २०/०८/२०११**

आज शनिवार दि. २०/०८/२०११ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा सकाळी ११.०० वाजता सभा सुचना क्र. ०५ दि. ०८/०८/२०११ रोजीच्या विषयपत्रिकेवर विचार विनिमय करणेकरिता महापालिका सभागृह, ३ रा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह येथे मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली भरली असता खालीलप्रमाणे सदस्य हजर होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | पाटील जयंत महादेव | उपमहापौर |
| २) | मेन्डोन्सा स्टीवन जॉन | सभापती, स्थायी समिती |
| ३) | शेख आसिफ गुलाब | विरोधी पक्षनेता |
| ४) | दिव्या अशोक तिवारी | सदस्या |
| ५) | म्हात्रे मिलन वसंत | गटनेता |
| ६) | वैती नर्मदा यशवंत | सदस्या |
| ७) | सिंह मदन उदितनारायण | सदस्य |
| ८) | शेट्टी गणेश गोपाळ | सदस्य |
| ९) | जाधव मोहन महादेव | गटनेता |
| १०) | पाटील प्रविण मोरेश्वर | सदस्य |
| ११) | म्हात्रे राजेश हरिश्चंद्र | सदस्य |
| १२) | म्हात्रे कल्पना महेश | सदस्या |
| १३) | अग्रवाल ओमप्रकाश गंगाधर (गाडोदिया) | गटनेता |
| १४) | पाटील ध्रुवकिशोर मन्साराम | सदस्य |
| १५) | पाटील मिलन गोविंदराव | सदस्य |
| १६) | व्यास सुधा वासुदेव | सदस्या |
| १७) | रॉड्रीक्स मॉरस जोसेफ | सदस्य |
| १८) | फॅरो ग्रिटा स्टीफन | सदस्या |
| १९) | म्हात्रे नयना गजानन | गटनेता |
| २०) | पाटील अनंत रामचंद्र | गटनेता |
| २१) | गोविंद हेलन जॉर्जी | सदस्या |
| २२) | डिमेलो बर्नड आल्बर्ट | सदस्य |
| २३) | बाविघर सिसिलीया विजय | सदस्या |
| २४) | परेरा टेरी पॉल | सदस्य |
| २५) | परेरा कॅटलीन ऍन्थोनी | सदस्या |
| २६) | ठाकुर प्रकाश पांडुरंग | सदस्य |
| २७) | डॉ. राजेंद्र भवरलाल जैन | सदस्य |
| २८) | शर्मा भगवती | गटनेता |
| २९) | पाटील वंदना मंगेश | सदस्या |
| ३०) | नरेंद्र मेहता | गटनेता |
| ३१) | पाटील संध्या प्रफुल्ल | सदस्या |
| ३२) | वर्षा भानुशाली | सदस्या |
| ३३) | सिंग श्रीप्रकाश जिलेदार | सदस्य |
| ३४) | पांडे स्नेहा शैलेश | सदस्या |
| ३५) | वैती विजया हेमचंद्र | सदस्य |
| ३६) | पालांडे प्रशांत भगवंतराव | सदस्य |
| ३७) | दुबे रामनारायण सदानंद | सदस्य |
| ३८) | भोईर राजू यशवंत | सदस्य |
| ३९) | चक्रे वंदना रामदास | सदस्या |
| ४०) | माळी हेमा रविंद्र | सदस्या |
| ४१) | हसनाळे जोत्सना जालींदर उर्फ शिंदे पूजा प्रताप | सदस्या |

| | | |
|---|---|---|
| ४२) | यादव मिरादेवी रामलाल | सदस्या |
| ४३) | म्हात्रे मोहन गोपाळ | सदस्य |
| ४४) | पाटील अनिता जयवंत | सदस्या |
| ४५) | संजय पांगे | नामनिर्देशित सदस्य |
| ४६) | प्रकाश दुबोले | नामनिर्देशित सदस्य |
| ४७) | आसिफ पटेल | नामनिर्देशित सदस्य |

**<u>गैरहजर सदस्य –</u>**

| | | |
|---|---|---|
| १) | पाटील प्रभात प्रकाश | सभागृह नेता |
| २) | शानू जो. गोहिल | सदस्या |
| ३) | पाटील उमाताई शाम | सदस्या |
| ४) | नलावडे दिनेश दगडू | सदस्य |
| ५) | वेतोसकर राजेश शंकर | सदस्य |
| ६) | पाटील सुनिता कैलास | सदस्या |
| ७) | पुरोहित मधुसुदन मनोहरलाल | गटनेता |
| ८) | पाटील धनेश परशुराम | गटनेता |
| ९) | पाटील शरद केशव | सदस्य |
| १०) | सावळे निर्मला बाबुराव उर्फ कांबळे निर्मला विष्णू | सदस्या |
| ११) | कुरेशी याकुब ईस्माईल | सदस्य |
| १२) | भोईर शशिकांत जगन्नाथ | सदस्य |
| १३) | भोईर सुनिता शशिकांत | सदस्या |
| १४) | पाटील प्रेमनाथ गजानन | सदस्य |
| १५) | शेख मुसरर्तबानु इब्राहिम | सदस्या |
| १६) | जंगम लक्ष्मण गणपत | सदस्य |
| १७) | सपार उमा विश्वनाथ | सदस्या |
| १८) | इनामदार जुबेर अब्दुल्ला | सदस्य |
| १९) | पुजारी कांचन शेखर | सदस्य |
| २०) | मुंज वासुदेव भास्कर | सदस्य |
| २१) | सय्यद नुरजहॉं नझर हुसैन | सदस्या |
| २२) | शेख नुर मोहम्मद अेहमद | सदस्य |
| २३) | खान शफीक अहमद सादत | गटनेता |
| २४) | सरिता चंद्रकांत म्हात्रे | सदस्या |
| २५) | डिसा मर्लिन मर्विन | सदस्या |
| २६) | ठाकूर कल्पना हरिहर | सदस्या |
| २७) | म्हात्रे चंद्रकांत खंडोजी | सदस्य |
| २८) | मोदी चद्रकांत भिकालाल | सदस्य |
| २९) | भट दिप्ती शेखर | सदस्या |
| ३०) | सामंत प्रमोद जयराम | सदस्य |
| ३१) | शेख सलिम दाउद | सदस्य |
| ३२) | हरिश्चंद्र जगन्नाथ म्हात्रे | सदस्य |
| ३३) | गावंड मंदाकिनी आत्माराम | सदस्या |
| ३४) | परशुराम पाटील | नामनिर्देशित सदस्य |
| ३५) | अरुण कदम | नामनिर्देशित सदस्य |

**<u>रजेचा अर्ज –</u>**

| | | |
|---|---|---|
| १) | तुळशीदास दत्तु म्हात्रे | महापौर |
| २) | सावंत अनिल दिवाकर | सदस्य |

**नगरसचिव :-**

सभागृहाच्या वतीने मा. उपमहापौर श्री. जयंत पाटील यांना विनंती करतो की, त्यांनी पिठासीन अधिकारी म्हणून काम बघावे. कोरम झालेला आहे. सर्वांनी राष्ट्रीय गितासाठी जागेवर उभे राहायचे आहे.

(“वंदे मातरम्” या राष्ट्रीय गिताने सभेला सुरूवात करण्यांत आली.)

**नगरसचिव :-**

मा. पिठासीन अधिका-यांच्या परवानगीने सभेला सुरूवात करत आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा शनिवार, दि. २०/०८/२०११ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात महासभा सुचना क्र. ०५, दि. ०८/०८/२०११ रोजी सोबतच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. प्रश्नोत्तराच्या तासाला सुरूवात होत आहे. बारा वाजलेले आहे. श्री. ओमप्रकाश गंगाधर अग्रवाल यांचा प्रश्न आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

विषय क्र. ४४ बद्दल आत्ताच महिन्यापूर्वी मा. स्थायी समितीने त्याला मुदतवाढीचा ठराव मांडलेला आहे. आणि त्यांना मुदतवाढ दिलेली आहे. तर याबाबत आत्तापर्यंत किती नेमप्लेटचे काम झालेले आहे? आणि आत्ता जी मुदत दिलेली आहे, त्यामध्ये काय काय इन्स्ट्रक्शन संबंधित ठेकेदाराला दिलेल्या आहेत. याबाबत माहीती द्यावी.

**दिपक सावंत :-**

मा. पिठासीन अधिका-यांच्या परवानगीने बोलतो. नंबर प्लेट लावण्याच्या बाबतीत मा. स्थायी समितीने दोन वर्षांची मुदतवाढ दिलेली आहे. दोन वर्षामध्ये उर्वरित सर्व नंबर प्लेट लावायच्या आहे. दि. २७/०८/२००९ पूर्वी स्टॅन्डीग कमिटीने मान्यता दिली होती. दोन वर्षामध्ये फक्त अठ्ठावीस हजार नंबरप्लेट लावून झाल्या होत्या. उर्वरित अंदाजे दोन लाख साठ हजार प्रॉपर्टीचे नेमप्लेट लावणे बाकी आहे. या बाबतीमध्ये संबंधित मे. महालक्ष्मी महिला औद्योगिक उत्पादक सहकारी संस्था मर्यादित यांना प्रत्येक दिवशी कमीत कमी दहा कर्मचारी लावून पाचशे प्रॉपर्टीचे नंबरप्लेट लावण्याच्या सुचना दिलेल्या आहेत. जेणेकरून त्यांनी डिसेंबर २०१३ पर्यंत दोन वर्षांची मुदतवाढ दिलेली आहे, तेवढ्या पिरिएडमध्ये सर्व प्रॉपर्टीचे नेमप्लेट लावून होतील.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आत्ता आपण सांगितले की, दहा कर्मचारी वर्ग लावायचे. त्याच्यावर जे काही आहेत ते आपले. तेव्हा त्यांनी सुरूवात केली की, नाही?

**दिपक सावंत :-**

आपण सर्व अगोदरच, पूर्वी २००९ मध्ये ज्यावेळेस ठेका दिला होता. त्यावेळेस संबंधित प्रभाग अधिकारी, वसुली क्षेत्रीय अधिकारी यांना पत्र देऊन यांना सहकार्य करण्याविषयी सुचना दिल्या होत्या. त्याचबरोबर कर निरिक्षक, लिपीक, आणि त्यांचा जो शिपाई आहे, यांना बरोबर घेऊन त्या संस्थेने ज्या-ज्या एरियामध्ये जाईल, प्रभाग समिती वॉर्डमध्ये जाईल त्या वॉर्डमध्ये बरोबर जाऊन काही अडचणी आल्या तर तिथे सोडवून त्या नंबरप्लेट लावायच्या आहेत. तशा सुचना संबंधित कर्मचा-यांना दिलेल्या आहेत.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब, माझ्या माहीतीप्रमाणे स्टॅण्डींग होऊन त्या विषयाला दोन महिने झालेले आहेत. कुठल्याही प्रभाग अधिका-यांनी याबाबत काळजी घेतली आहे असे दिसून येत नाही. कारण मी स्वतः प्रभाग अधिका-यांना भेटलो होतो. त्यांना कधी गणपती, कधी राजकिय, प्रशासकिय कामामध्ये वेळ मिळत नाही म्हणून माझी सभागृहाला अशी विनंती आहे, शासनाच्या ज्या प्रत्येक योजना येतात, रेशन कार्ड असो, आधार कार्ड असो, त्या सर्व योजना येतात. पण अधिकारी वर्ग काम करत नाही. म्हणून त्या अर्धवट राहतात. आणि शेवटी शासनाला ती योजना पुन्हा माघारी घ्यावी लागते. म्हणून मा. आयुक्त साहेब, अनेक वेळा अशा योजना आलेल्या आहेत. पण काम अर्धवट होते.  हे पण नक्की आहे. ज्याला काम द्यायचे असेल त्याचे पेमेंट पण आपण देतो. म्हणून त्यांनी काम केले नाही म्हणून त्यांची काहीतरी रक्कम शिल्लक राहते किंवा त्याला काही पेमेंट आपल्याकडे बाकी आहे असा विषय राहात नाही. म्हणून ते काळजी घेत नाहीत. याबाबत आपण लक्ष घालावे की, आपण की, आपण ही जी योजना दोन वर्षात पूर्ण करायची दिलेली आहे. त्याच्यावर लक्ष घालून या सर्व नेमप्लेट लागतील आणि नेमप्लेट बाबतची जी काही रक्कम अदा करायची, याबद्दल आपण काळजी घ्यावी. लोक अपेक्षित करतात की, आमचे प्रॉपर्टी नंबर लागावे. पण काम स्लो आहे. काम होत नाही असे सांगत नाही. त्यामुळे प्रशासनाने पूर्णपणे लक्ष द्यावे हीच माझी या प्रश्नावर विनंती आहे. साहेब, माझा जो दुसरा प्रश्न आहे, लेखापरिक्षण अहवाल. आत्ता प्रश्न २०१० साली दिलेला आहे. त्यानंतर बहुतेक दुसरा प्रशासन अहवाल आलेला आहे. तर माझी अशी विनंती आहे की, दोन्ही प्रशासन अहवालाबद्दल, एक तर आत्तापर्यंत काहीतरी झाले असेल, त्याच्याबद्दल, एक तर आत्तापर्यंत काहीतरी झाले असेल, त्याच्याबद्दल अधिका-यांनी माहीती द्यावी. कारण लेखापरिक्षण अहवाल हा मा. महासभेपुढे आला पाहीजे. त्याच्यात ज्या त्रुटी आहेत त्या झाल्या पाहीजे. पण आत्तापर्यंत आलेला नाही. हा प्रश्न देऊन बरोबर एक वर्षाच्या वर झाले आहे. मी मागच्या प्रशासन अहवालाबद्दल विचारले होते. अधिका-यांनी त्याबद्दल काय-काय कार्यवाही केलेली आहे, याचे रितसर उत्तर मला दिलेले नाही.

**दादासाहेब पाटील (मुलेप) :-**

सन्मा. महापौर साहेबांच्या परवानगीने बोलतो. २००६-०७, २००७-०८, २००८-०९ आणि २००९-१० हे सर्व लेखापरिक्षण अहवाल जे आहेत ते आम्ही स्टॅण्डींग कमिटीला सादर केलेले आहेत. ते फक्त स्टॅण्डींग कमिटीला सादर करायचे असतात, मा. महासभेला द्यायचे नसतात. आणि आम्ही ते सादर केलेले आहेत.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

त्यामध्ये आक्षेप होते. आत्ता अतिक्रमण विभाग आहे. अतिक्रमण विभागाने आत्तापर्यंत जी तोडू कार्यवाही केली आहे, ते पैसे वसुल केले पाहीजे होते. त्याच्यावर आक्षेप होता. पण आपण जर अहवाल बघितला असेल तर त्यांच्याकडून काही वसुली झालेली नाही. अतिक्रमण विभागाला आपण आक्षेपबद्दल कळवले आहे का? किती वसुली झाली? किती अपेक्षित होती? आणि किती बांधकाम तोडले?

**दादासाहेब पाटील (मुलेप) :-**

त्याच्यावर स्टॅण्डींग कमिटीमध्ये तीन चार वेळा चर्चा झालेली आहेत. आणि मागच्या स्टॅण्डींगने त्यांना असे डायरेक्शन दिले आहेत की, आम्हाला पुढच्या मिटींगमध्ये सविस्तर अहवाल द्या.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

पुढची कोणती मिटींग? या प्रस्तावाला एक वर्ष होऊन गेले आहे.

**दादासाहेब पाटील (मुलेप) :-**

मागच्या स्टॅण्डींगला दिले आहे, असे त्यांचे म्हणणे आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

लेखापरिक्षण अहवाल दिलेला नाही. प्रशासन अहवाल दिलेला आहे.

**दादासाहेब पाटील (मुलेप) :-**

साहेब, आत्तापर्यंतचे लेखापरिक्षण अहवाल दिले आहेत.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मग, मला आत्ता सांगा की, अतिक्रमण विभागाकडून आत्तापर्यंत किती वसुली झाली?

**दादासाहेब पाटील (मुलेप) :-**

वसुली किती झाली ते मागच्या स्टँडींगला दिले आहे. मागच्या स्टँडींगला मी नव्हतो त्यामुळे मला माहिती नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब, मागच्या वेळी एवढी मोठी तोडू कारवाई झाली होती. महापालिकेला कमीत कमी तीस ते चाळीस लाख रुपये वसूली होती. त्याच्यासमोर फक्त तेरा ते चौदा हजार रुपये वसुली झाली.

**दादासाहेब पाटील (मुलेप) :-**

त्याच्यामध्ये मला असे वाटते की, जी काही वसुली आहे ती त्या-त्या विभागाला स्पेशली कर विभागाला त्या-त्या माणसाच्या नावावर..............

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मी अतिक्रमणचे विचारतो.

**दादासाहेब पाटील (मुलेप) :-**

मी अतिक्रमणचेच सांगतो. त्यांनी कर विभागाकडे त्यांच्या नावावर त्या फिगर ॲड करण्यासाठी पाठवले आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

तुम्ही ती माहीती घेतली का?

**दादासाहेब पाटील (मुलेप) :-**

तो माझा विषय नाही. माझा अहवाल सादर करायचा विषय आहे. मी अहवाल सादर केलेला आहे. आणि मागच्या स्टॅण्डींगला आत्ता जो करंट अहवाल सादर केलेला आहे. आणि मागच्या स्टॅण्डींगला आत्ता जो करंट अहवाल आहे. त्याच्यावर त्यांनी सांगितले की, एक महिन्यामध्ये आम्हाला तुम्ही डिटेल द्या. त्याला अजून एक महीना झालेला नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आपले काम नाही हे नक्की आहे. ही वसुली न झाल्यामुळे महापालिकेचे अर्थिक नुकसान होते. त्यावर आपली काय भुमिका, म्हणजे काय आक्षेप आहे?

**दादासाहेब पाटील (मुलेप) :-**

आक्षेप घेतल्यानंतर आत्ता तो त्या-त्या विभागाला दिला आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आत्ता माझा हा प्रश्न २०१० सालाचा आहे. दुसऱ्या महिन्याचा प्रश्न आहे. आज २०११ आणि सातवा महिना चालू आहे. आपण कधी दिलेले आहे? हे आक्षेप कधी पाठवलेले आहेत? अतिक्रमणकडून आपल्याकडे रिपोर्ट आला की, नाही?

**दादासाहेब पाटील (मुलेप) :-**

साहेब, आम्ही ज्यावेळेस आक्षेप देतो. आक्षेप दिल्यानंतर आम्हाला ते सर्व कळवतात. त्यांना आम्ही वारंवार पत्र काढलेली आहे की, आम्हाला याची माहीती द्या.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

ती माहिती आली का, हेच विचारतो आहे.

**दादासाहेब पाटील (मुलेप) :-**

बरीचशी माहीती आलेली आहे. आणि आल्यानंतर महीती अतिक्रमणने कर विभागाकडे ट्रान्सफर केलेली आहे की, ज्याचे बांधकाम तोडलेले आहे. त्याच्या जर दुस-या प्रॉपर्टी असतील तर त्या प्रॉपर्टीमध्ये या रक्कमा ॲड करा.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

किती रक्कम ॲड केली?

**दादासाहेब पाटील (मुलेप) :-**

साहेब, अतिक्रमणवाले तुम्हाला ती डिटेल सांगू शकतील. स्टॅण्डींगला त्यांनी अहवाल दिला आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

अतिक्रमणचे अधिकारी आहेत का?

**मिलन पाटील :-**

मा. महापौर साहेब, मी आपल्या परवानगीने बोलतो. हा विषय लेखापरिक्षकांचा नाही. जी वसुली आहे ती मा. आयुक्त साहेब बघतील. ते कोणाला हुकूम सोडणार आहेत? त्यांना तो अधिकार आहे का? हा आमचा नाहक वेळ घालविण्याचा प्रकार आहे. तुम्ही मा. आयुक्तांना विचारा की, या वसुलीचा तुम्ही आम्हाला अहवाल द्या. किंवा मा. महासभेला कळवा. मा. आयुक्त वसुल करतील त्यांच्या बाजूने..........

**भगवती शर्मा :-**

तो संपूर्ण अहवाल. स्टॅण्डींगमध्ये ठेवलेला आहे. जसे यांनी सांगितले की, किस विभागसे कितनी रिकव्हरी हुयी, कितनी बाकी है, क्या रिझन है, इन्होने क्या आक्षेप लिया है, ऑब्जेक्शन लिया है, किसकी पध्दती सही है गलत है। उसके उपर मेरे ख्याल से स्टॅण्डींग या उसके बाद वहापर भी पुरा अहवाल प्रस्तु होगा। उसके बाद चाहिए। तो मा. महासभामे भी उसके बारे मे चर्चा हो सकती है।

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब, माझा प्रश्न ०२, कोणकोणते आक्षेप कोणकोणत्या प्रभागाला पाठवले आहेत? कधी दिलेले नाही. तुम्ही आक्षेप पाठवले तर मला आत्ता तारीख सांगा. कोणत्या विभागाला किती तारखेला कोणकोणते आक्षेप पाठवलेले आहेत?

**दादासाहेब पाटील (मुलेप) :-**

साहेब, जी पुस्तिका आहे, ती पुस्तिका आम्ही त्या विभागाला देतो. त्या पुस्तिकेमध्ये त्या विभागाचे सर्व आक्षेप असतात. त्यामुळे त्यांना ते आक्षेप लगेच मिळतात.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आपण पुस्तिका दिली. आत्ता त्याच्यावर त्यांनी वसुली केली नाही. मग हा विषय मा. आयुक्तांचा आहे की, तुमचा आहे?

**दादासाहेब पाटील (मुलेप) :-**

ते आक्षेप पुर्तता झाली नाही तर तो आक्षेप परत घेत नाही. तो आक्षेप तसाच राहतो. आत्ता आमच्याकडे २४१ आक्षेप हाते. त्याच्यामधल्या १८१ आक्षेपांची पुर्तता झालेली आहे. उरलेले आक्षेप अजून आलेले नाहीत. त्याच्यामध्ये वसुलीपण असतील.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आपण मा. आयुक्तांना हे कळवले का? आत्ता हे बोलले की, मा. आयुक्तांचा अधिकार आहे. मग मा. आयुक्तांना कळवणार कोण?

**दादासाहेब पाटील (मुलेप) :-**

त्या विभागाला दिल्यानंतर अतिक्रमण विभागाने कर विभागाला दिले आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आत्ता सन्मा. नगरसेवकांनी विचारावे. आत्ता मा. आयुक्त साहेब आलेले आहेत. तुम्हीच विचारावे की, तुमच्याकडे आहवाल आला की नाही? फक्त बोलणे सोपे आहे की, यांचा अधिकार नाही. आत्ता कोणाचा अधिकार आहे? मी तुम्हाला सांगतो की, माझ्या वतीने तुम्ही विचारा.

**सुधीर राऊत (मा. उपायुक्त (मु.) :-**

अतिक्रमण विभागाचा प्रभारी उपायुक्त म्हणून या संदर्भामध्ये माहीती देतो की, अतिक्रमण विभागाने साधारणतः गेल्या पाच आर्थिक वर्षामध्ये तोडकामाची जी कारवाई केली म्हणजे २०११-१२ धरून, त्याची पूर्ण माहीती मागच्या मा. स्थायी समितीच्या सभेमध्ये सादर केलेली होती. कारण मा. स्थायी समितीमध्ये ते विषय वारंवार निघाला हाता. आणि त्या पध्दतीने प्रत्येक वर्षी किती अतिक्रमणांवर कारवाई केली, किती अनधिकृत बांधकामावर कारवाई केली? त्याचप्रमाणे किती अनधिकृत बांधकामे आणि अतिक्रमणांवर वसुलीच्या नोटीसा बजावल्या आणि त्या वसुलीच्या नोटीसा पुढील कार्यवाहीसाठी संबंधित प्रभाग अधिका-यांकडे पाठविण्यात आलेल्या आहेत. ही सर्व आकडेवारी त्या-त्या प्रभाग अधिका-यांकडे निहीत आहे. आणि जी काही आकडेवारी आहे, ती मा. स्थायी समितीच्या मागील सभेवर ठेवण्यात आली होती.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

ती मंजुर झाली?

**सुधीर राऊत (मा. उपायुक्त (मु.) ) :-**

याच्यामध्ये ही जी चर्चा होती, मा. अध्यक्षांच्या परवानगीने, ही मागच्या मा. स्थायी समितीवर जो विषय होता, हा वार्षिक लेखे मंजुर करण्यासंदर्भात होता. आणि वार्षिक लेख्यांमध्ये अतिक्रमण विभागाकडून करण्यात आलेली वसुली अत्यल्प दिसल्यामुळे मा.स्थायी समितीने त्याच्यावर आक्षेप घेतला होता. या आक्षेपावर अतिक्रमण विभागाला फ्रेश आकडेवारी सादर करण्यासंदर्भात मा. सभापती स्थायी समिती यांनी आदेशित केले होते. त्या आदेशानुार अतिक्रमण विभागाने त्यांचे लेटेस्ट आकडेवारी जी आहे, ती मा. स्थायी समितीच्या पटलावर ठेवलेली आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. आयुक्त साहेब, विषय गंभीर आहे. आपण जर महापालिकेचा लेखापरिक्षण अहवाल बघितला. त्यामध्ये अनेक त्रुटी आहेत. त्यामुळे महापालिकेचे आर्थिक नुकसान होते. कारवाई करायला पाहीजे असा आमचा विषय नाही. यामध्ये अनेक डिपार्टमेटची वसुली बाकी आहे. फक्त लेखापरिक्षण अहवाल स्टॅण्डीगपुढे ठेवला. आणि मान्यता मिळाली किंवा काय झाले , पुढे त्याच्यावर कार्यवाही होत नाही. आत्ता ज्या पध्दतीने प्रशासननों अहवाल दिला, मी यापुढे जाणार आहे. सर्व माहीती घेणार आहे. पण आपणही याच्यावर लक्ष घालावे, अशी आपल्याला विनंती आहे.

**नगरसचिव :-**

दुसरा प्रश्न श्री. अनिल सावंत यांचा आहे. ते गैरहजर आहेत. प्रश्न क्र. ४६ देखील श्री. अनिल सावंत यांचा आहे. प्रश्न क्र. ४७, ४८, श्री. अनिल सावंत यांचा आहे. प्रश्न क्र. ४९ श्रीम. मिरादेवी यादव यांचा आहे.

**मिरादेवी यादव :-**

कमिशनर साहेब, मुझे श्री. विजय पाटील इन्होन जवाब दिया है। मगर जनता नगर मे २००५ से टॅक्स लगाना और ट्रान्सफर करना बंद है। उसके बाद कितना टॅक्स ट्रान्सफर हुए उसकी जानकारी मुझे चाहिए।

**जयंत पाटील (मा. पिठासीन अधिकारी ) :-**

आपका सवाल क्या है, वो पहले देखिए। आपका सवाल ऐसा है की, मिरा भाईंदर महानगरपालिकेतर्फे नवीन कर आकारणी उदा. टॉवर, झोपडपट्टी, इंडस्ट्रीअल गाळे व खुल्या जागेबाबत कोणकोणत्या प्रोसिजर केल्या जातात?

**मिरादेवी यादव :-**

श्री. विजय पाटील ने वे जवाब मुझे दिया है। मगर मै यह टॅक्स का पुछ रही हूँ की, कितने बदली हो गये वो मुझे बताईए।

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

“ब” मध्ये यादी जोडलेली ती दिलेली नाही.

**दिपक सावंत :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो. महापालिका वॉर्ड क्र. “ओ” दाचकुल पाडा, मांडवी पाडा, मिनाक्षी नगर, जनता नगरमध्ये ०१/०१/२०१० ते १९/०७/२०१० पर्यंत एकूण किती झोपडपट्टींना नवीन कर आकारणी केली याची जी यादी आहे, १ ते ३३, ती दिलेली आहे.

**मिरादेवी यादव :-**

यह जवाब मुझे मिला है। मगर मै जनता नगर का पुछ रही हूँ, जो टॅक्स ट्रान्सफर हुए है, उसका जवाब मै मांग रही हूँ। कितने टॅक्स ट्रान्सफर हुए है? उसका जवाब मांग रही हूँ। एक जण मुझे मिला है।

**दिपक सावंत :-**

उसकी लिस्ट मै आपको देता हूँ।

**नगरसचिव :-**

आजच्या सभेपुढे तीन लक्षवेधी आलेल्या आहेत. पहिली लक्षवेधी श्रीम. प्रभात प्रकाश पाटील यांची आहे. मिरा भाईंदर महापालिका क्षेत्रात औद्योगिक गाळेधारकांच्या विषयी लक्षवेधी सुचना आहे. दुसरी लक्षवेधी श्री. ओमप्रकाश अग्रवाल यांची आहे. परिवहन सेवेमुळे होणारे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान, उत्तन-गोराई येथील नागरिकांना होणाऱ्या गैरसोयीबाबत. तिसरी लक्षवेधी श्री. भगवती शर्मा यांची आहे. जैन धर्मियांच्या पर्युषण पर्व काळात मांस, मटण, मच्छी विक्री दुकाने व कत्तलखाने बंद ठेवण्याबाबत लक्षवेधी. अशा तीन लक्षवेधी आलेल्या आहेत. या तिनही लक्षवेधी मी मा. पिठासीन अधिकारी यांच्याकडे सुपूर्द करतो.

**जयंत पाटील (मा. पिठासीन अधिकारी ) :-**

जैन धर्मियांचे पर्युषण पर्व जवळ येत चाललेले आहे. तो विषय तातडीचा आहे, म्हणून श्री. भगवती शर्मा यांची लक्षवेधी घ्या आणि बाकीच्या दोन लक्षवेधी मी फेटाळत आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहेब, आपण जर लक्षवेधीचे नियम बघितले, जिकडे महापालिकेचे आर्थिक नुकसान होते. आणि महापालिकेच्या नागरिकांचे आर्थिक नुकसान होते आहे. त्यावर लक्ष वेधण्याचा विषय असतो. मटण दुकाने बंद करावी तो विषय ''ज'' मध्ये दिलेला आहे.

**जयंत पाटील (मा. पिठासीन अधिकारी ) :-**

मग हा विषय नको घेऊ का? तुम्ही खाली बसा.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

तुम्ही आत्ता सिक्युरिटी आणली आहे. आम्ही बसू. पण काल उत्तनमध्ये घटना घडली. मागच्या वेळी श्री. अनिल सावंत यांनी.............

**जयंत पाटील (मा. पिठासीन अधिकारी ) :-**

तुम्ही खाली बसा असे मी म्हणतो आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

बसायचे आहे. पण ज्या विषयाला तातडीचे, आज परिवहन सेवेमुळे या शहराला जे भोगायला लागते, ते तुमच्या लक्षात येत नाही. मागच्या वेळी लक्षवेधी वाचून दाखवायची असा विषय झाला होता.

**भगवती शर्मा :-**

मा. पिठासीन अधिकारी के परवानगीसे। जैन धर्म का पर्युषण पर्व हर बार के भॉती इस बार भी दिनांक २५ से लेकर १ तारीख तक होनेवाला है। हर वक्त मैने प्रशासन से पत्रव्यवहार किया है। २००७ मैने एक लक्षवेधी उस समय के मा. महापौर के सामने रखी थी। उन्होने मुझे उत्तर भी दिया था की, इस पर्व के अंदर शासन के नियमके हिसाब से पालन किया जाएगा। प्रतिवर्ष के अंदर उसी भॉती के अंदर समय समय पर पालन किया जाता है। लेकिन जो जी.आर. शासन ने जारी किया है, संकिर्ण-१०/२००४/प्र.क्र.१२१/नवि-२०, दि. ०७ सप्टेंबर २००४, मा. पिठासीनी अधिकारी, मुझे इस बारे में थोडासा एक खुलासा चाहीए की, जिसके अंदर के अंदर में लिखा हुआ है की, श्रावण वद्य १२ व भाद्रपद शुक्ल ४ और निचे लिखा हुआ है की, तरी पर्युषण पर्वातील उक्त दिवशी श्रावण वद्य १३ ते भाद्रपद शुक्ल ५ या दिवशी आपल्या क्षेत्रातील सर्व कत्तलखाने व मांस विक्रिची दुकाने बंद करणे समोयोचित करावे उसके अंदर थोडासा कन्फ्युजन होता है की, कितने दिन के अंदर थोडासा कन्फ्युजन होता है की, कितने दिन के अंदर शासन का जी.आर. है। इस शहर के अंदर सभी धर्म के, जाती के लोग रहते है। और सभी अपना त्योहार भली भॉती अच्छी तरह से मनाये है। आज तक किती तरह की कोई भी सांप्रदायीक भावना इस तरिके की नही फैली है। हमेशा एक अच्छे वातावरण के अंदर हर त्योहार मनाए जाते है। इस लक्षवेधी को लाने का मेरा मतलब यह है की, पिछले बार कुछ लोगो ने यहा पर यह जो दुकाने थी, जाकर जबरदस्ती बंद करवाने लगे थे। प्रशासनने कोई भी प्रतिक्रिया नही दी थी। एक तरह का रोष का वातावरण बनता जा रहा था। प्रशासन की इसके उपर क्या भुमिका है, वो इस समय स्पष्ट होनी चाहिए। ताकी यहा के सभी रहीवासी, मेरे जैन भाई है। खास कर मै जिस वॉर्ड से बिलॉग करता हूँ। बावन जिनालय भी उसी के अंदर आता है। और बावन जिनालय के ट्रस्टीने भी एक पत्र दिया है। जिसके अंदर उन्होने भी उल्लेख किया है की, सर्वसाधारणतः पर्युषण पर्व काळात व विशेष करून दिनांक २५, २९ ऑगस्ट व १ सप्टेंबर २०११ या दिवशी भाईंदर (प.) परिसरात विशेषतः स्टेशन रोडवरील इंदिरा मार्केट व मिरा भाईंदर पश्चिम व पूर्व इकडे असलेली मटन, मांस, मच्छी विक्री व कत्तलखाने बंद ठेवण्याबाबत आदेश काढण्यास विनंती आहे. उन्होने एक निवेदन दि. १७/०८/२०११ को दिया है। मेरी आपसे विनंती है की, शासन के जी.आर. की स्थिती स्पष्ट करते हुए यह जो पर्युषण पर्व चालू हो रहता है, उसके अंदर शुरूआत का दिन होता है। बीच के अंदर महावीर जन्म वाचन का दिन आता है। और अंत के अंदर मे यह तीन दिवस के अंदर के अंदर के अंदर मे हमेशा बंद रखा जाता है। लेकिन विशेष कर यह आठ दिन का है। मेरा यह नम्र निवेदन है की, इसके अंदर शासनके निर्णय के अनुसार जैसा मुझे पता चला है, उस हिसाबसे यह सभी दुकाने अगर बंद रखेंगे तो एक अच्छा मॅसेज जाएगा। मा. पिठासीन अधिकारी महोदय, मेरा आपसे फिर से एक नम्र निवेदन है की, इसके अंदर आप सभी धर्म का आदर करते हुए एक उचित निर्णय दे।

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

मा. महापौर साहेबांच्या परवनगीने बोलतो. दरवर्षी जैन धर्मियांच्या पर्युषण पर्वानिमित्त कत्तलखाने व मांस विक्रि दुकाने बंद ठेवण्याबाबत शासनाची दोन परिपत्रके आहेत. एक ७ सप्टेंबर २००४ चे आहे. आणि दुसरे दि. २२/०८/२००९ चे पत्र आहे. या दोन्ही पत्रांच्या अनुषंगाने आपण दरवर्षी, त्याच्यामध्ये कालावधी नमुद केलेला आहे. या कालावधीमध्ये श्रावण वद्य १२ ते भाद्रपद शुक्ल ५ म्हणजे इंग्लीश कालावधीमध्ये दि. २६/०८/२०११ ते २/०९/२०११ पर्यंत दरवर्षी जैन धर्मियांनी पर्युषण पर्व असल्यामुळे अहिंसा पाळण्यासाठी, या दिवसात फक्त अहिंसा पाळण्यात यावी. दुस-या दिवशी श्रावण वद्य १२ व भाद्रपद शुध्द ४, म्हणजे इंग्लीश कालावधीमध्ये दि. २६/०८/२०११ ते ०१/०९/२०११ या दोन दिवशी कम्पलसरी कत्तलखाने व मांस विक्री दुकाने बंद करावी असे शासनाचे स्पष्ट आदेश आहेत. आणि तिसरे श्रावण वद्य १३ ते भाद्रपद शुध्द ३ व ५ या दिवशी आवाहन करावे, म्हणजे दि. २७/०८/२०११, ३१/०८/२०११ व ०२/०९/२०११ या काळात कत्तलखाने व

मांसविक्री दुकाने बंद करण्याचे फक्त आवाहन करावे असे शासनाचे स्पष्ट धोरण आहे. त्यानुसार आपण कारवाई करतो.

**जयंत पाटील (मा. पिठासीन अधिकारी ) :-**

शासनाचा आदेश, श्रावण वद्य १२ व शुध्द चर्तुर्थी म्हणजे ज्या दिवशी गणेश चर्तुर्थी येते या दोन दिवशी शहरातील मटणाची दुकाने बंद करायची असा निर्णय झालेला आहे आण शासनाच्या निर्णयानुसार सर्व दुकाने बंद ठेवावीत असा मी अधिका-यांना आदेश देतो.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ४६, दि. १६/१२/२०१०, २२/१२/२०१० (दि. १६/१२/२०१० रोजीची तहकुब सभा), दि. १८/०१/२०११ व दि. ०१/०२/२०११ (दि. १८/०१/२०११ रोजीची तहकुब सभा) रोजीच्या मा. महासभांचे इतिवृत्तांत कायम करणे.

**कल्पना म्हात्रे :-**

मी श्री. अण्णा हजारे यांचा ठराव मांडते.

**जयंत पाटील (मा. पिठासीन अधिकारी ) :-**

श्री. अण्णा हजारे यांच्या सोबत आम्हीसुद्धा आहोत, सगळी जनता आहे, सगळे शहर आहे. त्या विषययावर ठराव करायची काही गरज नाही.

**कल्पना म्हात्रे :-**

आम्ही नागरिकांच्या वतीने ठराव मांडतो.

**भगवती शर्मा :-**

विषय ना होते हुए कोई ठराव हो सकता है क्या?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

विषय नसताना आपण किती वेळा ठराव केला.

**जयंत पाटील (मा. पिठासीन अधिकारी) :-**

भ्रष्टाचाराला आम्ही समर्थन करत नाही. भ्रष्टाचार कोणाला नको. श्री. ओमप्रकाश अग्रवाल तुम्ही खाली बसा. आम्ही तुमच्या सोबतच आहोत. सगळे सभागृह तुमच्या सोबत आहे. तुम्ही खाली बसा. ठराव होऊ शकत नाही.

**आसिफ शेख :-**

दि. १६/१२/२०१०, २२/१२/२०१० (दि. १६/१२/२०१० रोजीची तहकुब सभा), दि. १८/०१/२०११ व दि. ०१/०२/२०११ (दि. १८/०१/२०११ रोजीची तहकुब सभा) रोजीच्या मा. महासभांच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या सुचना व दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**भगवती शर्मा :-**

माझे अनुमोदन आहे.

**प्रशांत पालांडे :-**

मा. महापौर साहेब, आपल्याला हा अनुपालन अहवाल मिळतो.................

**जयंत पाटील (मा. पिठासीन अधिकारी ) :-**

प्रोसिडींग मंजुरीचा ठराव मंजुर झालेला आहे.

**प्रशांत पालांडे :-**

मा. महापौर साहेब, हा अनुपालन अहवाल आपल्याला देतात. तो बरोबर आहे का ते बघा. त्याच्यामध्ये आपण नक्की काय बोध घ्यायचा? कार्यवाही चालू आहे. त्याचा काही अर्थ लागतो का? ठराव झाल्यानंतर कार्यवाही करणारच पण आपल्याला एक्झॅक्ट, त्यासाठी आपण...................

**जयंत पाटील (मा. पिठासीन अधिकारी ) :-**

ठराव कार्यवाहीसाठी पाठवलेले आहेत.

**प्रशांत पालांडे :-**

आपण अनुपालन अहवाल अशासाठी मागतो..............

**आसिफ शेख :-**

विषयाला सुरूवात करा. मधुन कुठून अनुपालन अहवाल आला आहे.

**प्रशांत पालांडे :-**

मिनिट्स वाचल्यानंतर अनुपालन अहवालावर चर्चा होतो.

**जयंत पाटील (मा. पिठासीन अधिकारी ) :-**

आपल्याला अधिकारी माहीती देत आहेत.

**आसिफ शेख :-**

माहीती नंतर द्या. विषय पटलावर महत्वाचे विषय आहेत.

**प्रशांत पालांडे :-**

ते होणार आहेत. मा. महापौर साहेब, माहीती देऊ द्या.

**जयंत पाटील (मा. पिठासीन अधिकारी ) :-**

आपला हा विषय आपण नंतर घेऊ.

(सभागृहात गोंधळ )

**प्रकरण क्र. ४६ :-**

दि. १६/१२/२०१०, २२/१२/२०१० (दि. १६/१२/२०१० रोजीची तहकुब सभा), दि. १८/०१/२०११ व दि. ०१/०२/२०११ (दि. १८/०१/२०११ रोजीची तहकुब सभा) रोजीच्या मा. महासभांचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव क्र. ४९ :-**

दि. १६/१२/२०१०, २२/१२/२०१० (दि. १६/१२/२०१० रोजीची तहकुब सभा), दि. १८/०१/२०११ व दि. ०१/०२/२०११ (दि. १८/०१/२०११ रोजीची तहकुब सभा) रोजीच्या मा. महासभांच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या सुचना व दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. आसिफ शेख          अनुमोदक :- श्री. भगवती शर्मा**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

श्री. अनिल सावंत यांचा रजेचा अर्ज आहे. प्रकरण क्र. ४७, मिरा भाईंदर महानगरपालिकामधील प्रभाग क्र. ३७ चे पालिका सदस्य श्री. स्टिवन जॉन मेंन्डोंसा यांचे अनर्हते बाबतचे प्रकरण मा. न्यायाधीशाकडे (वरिष्ठ स्तर दिवाणी न्यायालय, ठाणे) पाठविण्यासाठी निर्णय घेणे. याच्या सोबत दुरूस्तीपण जोडलेली आहे.

**आसिफ शेख :-**

मिरा भाईंदर नगरपालिकेच्या सन २००० च्या सार्वत्रिक पोट निवडणूकीद्वारे श्री. स्टिवन जॉन मेंडोंसा यांची दि. ५/३/२००० ते २७/२/२००२ तसेच मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सन २००२ सार्वत्रिक निवडणूकीद्वारे दि. २८/८/२००२ ते २७/८/२००७ पर्यंत नगरसेवक म्हणून निवड झाली होती. तद्नंतर मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सन २००७ च्या सार्वत्रिक निवडणूकीद्वारे प्रभाग क्र. ३७ साठी श्री. स्टिवन जॉन मेंडोंसा यांची दि. २८/८/२००७ रोजी नगरसेवक म्हणून नेमणूक झालेली आहे.

नगरसेवक मिलन वसंत म्हात्रे यांनी मौजे उत्तन डोंगरी, सर्व्हे क्र. ३५१, मॅक्सवेल हॉटेल जवळ, हनुमान मंदिर नंतर डाव्या हातास असलेल्या सरकारी जागा अनधिकृतपणे बळकावून त्या सरकारी जागेत अतिक्रमण करून बंगला, प्लश स्विमिंग पुल, गोडाउन, स्टोर रूम, स्वच्छतागृह, शौचालय, बॉउंड्री वॉलचे बांधकाम, मोठे लोखंडी गेट टाकून अशा प्रकारे अनधिकृत बांधकाम केले असल्यामुळे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम चे कलम १०(१ड) नूसार श्री. स्टिवन जॉन मेंडोंसा यांचे नगरसेवक पद रद्द करण्याची मागणी केली आहे.

सदर तक्रारींच्या अनुषंगाने तत्कालीन आयुक्त यांनी तक्रारदार श्री. मिलन वसंत म्हात्रे व नगरसेवक श्री. स्टिवन जॉन मेंडोंसा यांचे म्हणणे ऐकून घेण्यासाठी सुनावणी आयोजित करून त्यांनी सादर केलेल्या कागदपत्रांचा अभ्यास करून दि. १९/५/२०११ रोजी श्री. स्टिवन जॉन मेंडोंसा यांचे महापालिका सदस्य म्हणून पद धारक करण्याचे अधिकार बंद झाल्याबाबतचे प्रकरणात निर्णय घेणेचा अधिकार न्यायाधिशास असल्याने मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम चे कलम १२ अन्वये सदर अनर्हतेबाबतचे प्रकरण मा. न्यायाधीशाकडे (वरिष्ठ स्तर दिवाणी न्यायालय, ठाणे) पाठविण्यासाठी निर्णय घेण्यास मा. महासभेपुढे ठेवण्यास आदेश पारीत केले आहेत.

सदर आदेशात तत्कालीन आयुक्त यांनी मौजे उत्तन डोंगरी, सर्व्हे क्र. ३५१ या सरकारी जागेत श्री. स्टिवन जॉन मेंडोंसा यांच्या नावे असलेल्या बांधकाम दि. ३/१२/१९९७ रोजीच्या कर आकारणीच्या नोटीसी नूसार सन १९९७ मधील असल्याचे दिसून येत आहे. परंतू श्री. स्टिवन जॉन मेंडोंसा सन २०००-२००२ व २००२-२००७ पर्यंत नगरसेवक म्हणून निवडून आले आहेत. त्यामुळे सदरचे बांधकाम श्री. स्टिवन जॉन मेंडोंसा यांनी ते नगरसेवक असताना केल्याचे सकृत दर्शनी सिध्द होत नाही असे नमुद केले आहे.

तसेच श्री. स्टिवन जॉन मेंडोंसा यांच्या पत्नी श्रीमती. नीला स्टिवन मेंडोंसा यांच्या नावे मौजे उत्तन डोंगरी, सर्व्हे क्र. ३५१ या जागेवर असलेल्या बांधकामासंदर्भात कर विभागाने सादर केलेल्या मालमत्तेचे प्रपत्रनूसार सदरचे बांधकाम सन १९९८-९९ मध्ये पूर्ण झाल्याचे नमुद केल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे श्री. स्टिवन जॉन मेंडोंसा यांनी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरित्या सदरचे बांधकाम नगरसेवक पदी असताना केल्याचे सकृत दर्शनी सिध्द होत नाही असे नमुद केले आहे. तसेच मौजे उत्तन डोंगरी, सर्व्हे क्र. ३५१ या जागेवरील श्री. स्टिवन जॉन मेंडोंसा यांच्या नावे असलेली मालमत्ताचे बांधकाम श्री. स्टिवन जॉन मेंडोंसा यांनी कधी बांधलेले आहे याचा पुरावा तक्रारदार यांनी सादर न केल्यामुळे श्री. स्टिवन जॉन मेंडोंसा यांनी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरित्या सदरचे बांधकाम नगरसेवक पदी असताना केले असल्याचे सकृत दर्शनी सिध्द झालेले नाही.

तरी वरील नमुद केलेले बांधकाम श्री. स्टिवन जॉन मेंडोंसा यांनी नगरसेवक पदी असताना केले आहे असे स्पष्ट सिध्द न झाल्यामुळे, या प्रकरणी कार्यालयीन अहवाल पाहता व चर्चेअंती सदरच्या प्रकरणात कारवाई करणेसाठी ही सभा सदरचा प्रस्ताव नामंजूर करीत आहे.

**भगवती शर्मा :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**जयंत पाटील (मा. पिठासीन अधिकारी ) :-**

प्रकरण क्र. ४७ चा ठराव मंजुर झालेला आहे.

**संजय पांगे :-**

मा. पिठासीन अधिकारी साहेब, मला एवढेच विचारायचे आहे की, विरोधी पक्षनेता ठराव वाचू शकतात का? तो कोणीही सदस्यांनी वाचावा. सभाशास्त्रात हे बसते आहे का, एवढेच मला विचारायचे आहे.

**जयंत पाटील (मा. पिठासीन अधिकारी ) :-**

कोणीही ठराव मांडू शकतात.

**आसिफ शेख :-**

सन्मा. सदस्य श्री. संजय पांगे हे आमचे चांगले मित्र आहेत, भाजपाचे नगरसेवक आहेत. त्यांचे चांगले ज्ञान आहे. अनुभव आहे. त्यांचा अभ्यासही चांगला आहे. आणि सभागृहाचे कामकाज कशा पध्दतीने चालते याची कल्पना त्यांना चांगल्या पध्दतीने आहे. सभागृहात कोणताही ठराव मांडताना आवश्यकता नाही की, मा. सभागृह नेत्यांनी मांडला पाहिजे किंवा विरोधी पक्षनेत्याने मांडला पाहिजे किंवा कोणत्या गटनेत्यांची मांडला पाहीजे. ज्यांना इच्छा असेल त्यांनी तो ठराव मांडायचा आणि ज्यांना इच्छा असेल त्यांनी अनुमोदन द्यायचे. अशी सभागृहातील सर्वसाधारणपणे परंपरा आहे. त्यामुळे मी ठराव वाचला त्यात काही चुक केले आहे असे मला वाटत नाही. तरी आपण कृपया अभ्यास करून बोलत चला.

**मिलन पाटील :-**

मा. महापौर साहेब, यापूर्वीसुध्दा मा. विरोधी पक्षनेता यांनी ठराव वाचलेले आहेत. आणि त्याला इतरांनी अनुमोदन सुध्दा दिलेले आहे. त्यावेळेला कोणीही ऑब्जेक्शन घेतलेले नाही.

**नरेंद्र मेहता :-**

मा. आयुक्त महोदय, मंजुरीसाठी विषय आलेला आहे. विषयावर ठरावसुध्दा झालेला आहे. मा. आयुक्त साहेबांनी आम्हाला हे जे काही गोषवारा दिलेला आहे. त्याच्यावर तत्कालीन मा. आयुक्त श्री. शिवमुर्ती नाईक साहेबांची सही आहे. याच्यामद्ये प्रशासनाची भुमिका नक्की काय आहे? प्रशासनाने याच्यामध्ये निष्कर्ष काय काढला? कुठेही नमुद केलेले नाही. म्हणजे अम्ही नक्की काय करायचे? ठरावाच्या बाजूने राहायचे की, विरोधात राहायचे ते आम्हाला कुठेही दिसत नाही. यावर प्रशासनाने आम्हाला दोन मिनिटे खुलासा केला की, यावर आपला निष्कर्ष काय आहे? बांधकाम झाले आहे, झाले नाही, काय करणार आहे, काय केले आहे, काय व्हायला पाहिजे हे आपण याच्यामध्ये कुठेही नमुद केलेले नाही. तर त्याच्यावर आपण कृपया खुलासा करावा.

**भगवती शर्मा :-**

मा. पिठासीन अधिकारी के परवानगीसे गोषवारा के अंदर इसके पहले के मा. आयुक्त श्री. शिवमुर्ती नाईक साहबने इस प्रकरण की सुनवाई की थी। और सुनवाई के अंदर जो साक्ष पालिका के पास थे, जो साक्ष श्री. स्टीवन मेन्डोंसा साहब के पास थे, जो साक्ष तक्रारदार के पास थे, उन्होने उनके सामने प्रस्तुत किए थे। वकिलोंने भी अपने तर्क वहा पर प्रस्तुत किए थे। वकीलोंने भी अपने तर्क वहा पर प्रस्तत किए थे। प्रस्तुत करनेके बाद उन्होंने ने सुनावणी के वाद अपना निष्कर्ष पुरा उसके अंदर दिया है. सबको गोषवारा मिला है। तो मुझे यह नही लगता कि, प्रशासनने उसके अंदर कोई चिज की, जानकारी देने की कमी रखी है की, किसने क्या पक्ष रखा है। और किसने क्या बोला है। और उसके बाद प्रशासन का क्या मत है। उस गोषवारा के अंदर पुरा उल्लेख है।

**नरेंद्र मेहता :-**

मा. आयुक्तांनी खुलासा करावा की, आम्ही नक्की कोणत्या बाजूने राहायचे.

**जयंत पाटील (मा. पिठासीन अधिकारी ) :-**

श्री. नरेंद्र मेहता साहेब, गोषवाऱ्यामध्ये संपूर्ण माहीती आहे.

**नरेंद्र मेहता :-**

दिलेले नाही. त्याच्यामध्ये “किंवा” हा शब्द वापरलेला आहे. मा. आयुक्तांना दोन मिनिट खुलासा करू द्या.

**जयंत पाटील (मा. पिठासीन अधिकारी ) :-**

मा. आयुक्तांनी बोलावे किंवा नाही. मी पिठासीन अधिकारी आहे. परंतु, आपण जर गोषवारा वाचला तर सगळी माहीती मिळेल.

**नरेंद्र मेहता :-**

प्रशासनाचा गोषवारा आहे. याच्यामध्ये प्रशासनाने मोगम काय सांगितले ते नक्की समजत नाही. "किंवा" शब्द वापरला गेला आहे. "केले किंवा नाही, कसे" स्पष्ट नमुद केलेले नाही. मा. आयुक्तांना दोन मिनिट बोलू द्या. काय फरक पडतो?

**मा. आयुक्त :-**

माजी मा. आयुक्तांनी या विषयावर सगळी सुनावणी घेतली होती. आणि त्याप्रमाणे त्यांनी जी ऑर्डर पास केली आहे. त्या ऑर्डरमध्ये त्यांनी सेक्शन कलम १२ अन्वये ऑर्डर पास केली आहे. कलम १२ कसे आहे ते मी आपल्याला सांगतो.

**नरेंद्र मेहता :-**

मला एवढेच कन्सर्न आहे की, प्रशासनाने त्या हिअरिंगचा निष्कर्ष काय काढला?

**मा. आयुक्त :-**

कलम १२ मध्ये असे नमुद आहे की, जर काही शंका असेल की, सेक्शन ११ प्रमाणे काऊन्सीलर पात्र किंवा अपात्र आहे. मग तसा प्रकार मा. महासभेपुढे ठेवून मा. न्यायधिशांकडे पाठवले पाहीजे. आणि आत्ता जी अमेंडमेंट झालेली आहे, त्याप्रमाणे मा. न्यायाधिशाऐवजी शासनाकडे अशी छोटीशी अमेंडमेंट झालेली आहे. आणि सेक्शन ११ मध्ये अपात्रतेचे सगळे रिझन नमुद आहेत. आणि १२ मध्ये नमुद आहे की, त्यात काही शंका असेल तर शासनाकडे पाठवायचे आहे. म्हणून माजी मा. आयुक्तांनी असा आदेश काढलेला आहे की, कलम १२ अन्वये हे मा. महासभेपुढे ठेवून मा. महासभेची मान्यता घेऊन ते शासनाकडे पाठवायचे आहे. त्याप्रमाणे ते समोर ठेवलेले आहे.

**नरेंद्र मेहता :-**

या ठरावात आम्ही आमची तटस्थ भूमिका घेतो. कारण प्रशासनाचे आम्हाला कुठेही क्लीअर होत नाही. म्हणून सर्वानुमते हा ठराव होऊ शकत नाही. आम्ही आमची तटस्थ भुमिका घेतो. तुम्ही आमचा विरोध नोंदवून घ्या.

**प्रकरण क्र. ४७ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकामधील प्रभाग क्र. ३७ चे पालिका सदस्य श्री. स्टिवन जॉन मेंन्डोंसा यांचे अनर्हते बाबतचे प्रकरण मा. न्यायाधीशाकडे (वरिष्ठ स्तर दिवाणी न्यायालय, ठाणे) पाठविण्यासाठी निर्णय घेणे.

**ठराव क्र. ५० :-**

मिरा भाईंदर नगरपालिकेच्या सन २००० च्या सार्वत्रिक पोट निवडणूकीद्वारे श्री. स्टिवन जॉन मेंडोंसा यांची दि. ५/३/२००० ते २७/२/२००२ तसेच मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सन २००२ सार्वत्रिक निवडणूकीद्वारे दि. २८/८/२००२ ते २७/८/२००७ पर्यंत नगरसेवक म्हणून निवड झाली होती. तद्नंतर मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सन २००७ च्या सार्वत्रिक निवडणूकीद्वारे प्रभाग क्र. ३७ साठी श्री. स्टिवन जॉन मेंडोंसा यांची दि. २८/८/२००७ रोजी नगरसेवक म्हणून नेमणूक झालेली आहे.

नगरसेवक मिलन वसंत म्हात्रे यांनी मौजे उत्तन डोंगरी, सर्व्हे क्र. ३५१, मॅक्सवेल हॉटेल जवळ, हनुमान मंदिर नंतर डाव्या हातास असलेल्या सरकारी जागा अनधिकृतपणे बळकावून त्या सरकारी जागेत अतिक्रमण करून बंगला, प्लश स्विमिंग पुल, गोडाउन, स्टोर रूम, स्वच्छतागृह, शौचालय, बॉउंड्री वॉलचे बांधकाम, मोठे लोखंडी गेट टाकून अशा प्रकारे अनधिकृत बांधकाम केले असल्यामुळे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम चे कलम १०(१ड) नूसार श्री. स्टिवन जॉन मेंडोंसा यांचे नगरसेवक पद रद्द करण्याची मागणी केली आहे.

सदर तक्रारींच्या अनुषंगाने तत्कालीन आयुक्त यांनी तक्रारदार श्री. मिलन वसंत म्हात्रे व नगरसेवक श्री. स्टिवन जॉन मेंडोंसा यांचे म्हणणे ऐकून घेण्यासाठी सुनावणी आयोजित करून त्यांनी सादर केलेल्या कागदपत्रांचा अभ्यास करून दि. १९/५/२०११ रोजी श्री. स्टिवन जॉन मेंडोंसा यांचे महापालिका सदस्य म्हणून पद धारक करण्याचे अधिकार बंद झाल्याबाबतचे प्रकरणात निर्णय घेणेचा अधिकार न्यायाधिशास असल्याने मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम चे कलम १२ अन्वये सदर अनर्हतेबाबतचे प्रकरण मा. न्यायाधीशाकडे (वरिष्ठ स्तर दिवाणी न्यायालय, ठाणे) पाठविण्यासाठी निर्णय घेण्यास मा. महासभेपुढे ठेवण्यास आदेश पारीत केले आहेत.

सदर आदेशात तत्कालीन आयुक्त यांनी मौजे उत्तन डोंगरी, सर्व्हे क्र. ३५१ या सरकारी जागेत श्री. स्टिवन जॉन मेंडोंसा यांच्या नावे असलेल्या बांधकाम दि. ३/१२/१९९७ रोजीच्या कर आकारणीच्या नोटीसी नूसार सन १९९७ मधील असल्याचे दिसून येत आहे. परंतू श्री. स्टिवन जॉन मेंडोंसा सन २०००-२००२ व २००२-२००७ पर्यंत नगरसेवक म्हणून निवडून आले आहेत. त्यामुळे सदरचे बांधकाम श्री. स्टिवन जॉन मेंडोंसा यांनी ते नगरसेवक असताना केल्याचे सकृत दर्शनी सिध्द होत नाही असे नमुद केले आहे.

तसेच श्री. स्टिवन जॉन मेंडोंसा यांच्या पत्नी श्रीमती. नीला स्टिवन मेंडोंसा यांच्या नावे मौजे उत्तन डोंगरी, सर्व्हे क्र. ३५१ या जागेवर असलेल्या बांधकामासंदर्भात कर विभागाने सादर केलेल्या मालमत्तेचे प्रपत्रनूसार सदरचे बांधकाम सन १९९८-९९ मध्ये पूर्ण झाल्याचे नमुद केल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे श्री. स्टिवन जॉन मेंडोंसा यांनी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरित्या सदरचे बांधकाम नगरसेवक पदी असताना केल्याचे

सकृत दर्शनी सिध्द होत नाही असे नमुद केले आहे. तसेच मौजे उत्तन डोंगरी, सर्व्हे क्र. ३५१ या जागेवरील श्री. स्टिवन जॉन मेंडोंसा यांच्या नावे असलेली मालमत्ताचे बांधकाम श्री. स्टिवन जॉन मेंडोंसा यांनी कधी बांधलेले आहे याचा पुरावा तक्रारदार यांनी सादर न केल्यामुळे श्री. स्टिवन जॉन मेंडोंसा यांनी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरित्या सदरचे बांधकाम नगरसेवक पदी असताना केले असल्याचे सकृत दर्शनी सिध्द झालेले नाही.

तरी वरील नमुद केलेले बांधकाम श्री. स्टिवन जॉन मेंडोंसा यांनी नगरसेवक पदी असताना केले आहे असे स्पष्ट सिध्द न झाल्यामुळे, या प्रकरणी कार्यालयीन अहवाल पाहता व चर्चेअंती सदरच्या प्रकरणात कारवाई करणेसाठी ही सभा सदरचा प्रस्ताव नामंजूर करीत आहे.

**सुचक :- श्री. आसिफ शेख** **अनुमोदक :- श्री. भगवती शर्मा**

**ठराव बहुमताने मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नरेंद्र मेहता :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेचे सदस्य श्री. परशुराम पाटील यांचे दि. २०/०८/२०११ रोजी दुःखद निधन झालेले आहे. तरी त्यांना श्रध्दांजली अर्पण करण्यासाठी आजची सभा तहकुब करावी असा मी ठराव मांडत आहे.

**भगवती शर्मा :-**

सभा चालू असताना विषय होऊ शकत नाही.

**जयंत पाटील (मा. पिठासीन अधिकारी ) :-**

हा दुसरा विषय झाला की, मग आपण सभेचा निर्णय घेऊ.

**नरेंद्र मेहता :-**

आम्ही मांडलेला आहे. बाकी निर्णय तुमचा आहे.

**प्रशांत पालांडे :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**नरेंद्र मेहता :-**

सचिव साहेब, आम्ही ठराव मांडलेला आहे. तहकुबचा ठराव मांडायचा आम्हाला अधिकार आहे. तो मा. महापौरांचा अधिकार नाही, सभागृहाचा अधिकार आहे.

**जयंत पाटील (मा. पिठासीन अधिकारी ) :-**

या विषयावर आम्हाला मतदान घ्यायची इच्छा नाही.

**नरेंद्र मेहता :-**

तुम्ही नका घेऊ. आम्ही मांडलेला आहे. सचिव साहेब, ठराव मांडल्यानंतर तुम्हाला याच्यावर निर्णय घ्यावा लागेल.

**भगवती शर्मा :-**

सभा चालू असताना ठराव मांडू शकतात का?

**मा.पिठासीन अधिकारी :-**

सचिव साहेब, पुढचा विषय घ्या.

**नरेंद्र मेहता :-**

सचिव साहेब, घेता येणार नाही. ठराव केलेला आहे. सभागृहाचा अधिकार आहे.

**जयंत पाटील (मा. पिठासीन अधिकारी ) :-**

मतदान घ्या.

**नगरसचिव :-**

सभा तहकुब करण्यासाठी सुचना आलेली आहे. मी सुचना वाचतो. मिरा भाईंदर महानगरपालिकेचे सदस्य श्री. परशुराम पाटील यांचे आज दि. २०/०८/२०११ रोजी १२.३० वाजता दुःखद निधन झाले आहे. तरी त्यांना श्रध्दांजली अर्पण करण्यासाठी आजची सभा तहकुब करावी असा मी ठराव मांडत आहे.

**भगवती शर्मा :-**

आमची पण सुचना आहे.

**आसिफ शेख :-**

आमची सुचना अशी आहे की, सन्मा. सदस्य श्री. परशुराम पाटील यांचे दुःखद निधन झाल्याची बातमी आलेली आहे. त्यामुळे आमची अशी सुचना आहे की, हा सदरचा विषय संपल्यानंतर घेण्यात यावा आणि आमची सुचना समाविष्ट करून घ्यावी.

**नगरसचिव :-**

सभा तहकुब करण्याबद्दल दोन सुचना आलेल्या आहेत. पहिली सुचना श्री. नरेंद्र मेहता सुचक आहेत. अनुमोदक श्री. प्रशांत पालांडे आहेत.

**आसिफ शेख :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेचे विद्यमान सदस्य मा. श्री. परशुराम दामोदर पाटील यांचे आज दि.२०/०८/२०१११ रोजी दुःखद निधन झाल्याची बातमी सभागृहात कळल्याने संपूर्ण सभागृह त्यांच्या परिवाराच्या या दुःखात सहभागी असून परमेश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती देवो व सद्गती देवो. तसेच या संकटसमयी त्यांच्या परिवारास हे दुःख सहन करण्याची परमेश्वर शक्ती देवो ही ईश्वर चरणी प्रार्थना. तसेच सभा पटलावर सुरु असलेला विषय पूर्ण झाल्यानंतर सभेत त्यांना भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करण्यात यावी व उर्वरीत विषयांकरीता सभा तहकुब करण्यात यावी अशी सुचना मी मांडत आहे.

**भगवती शर्मा :-**

माझे अनुमोदन आहे.

**नगरसचिव :-**

सभा तहकुब करण्याबद्दल दोन ठराव आलेले आहेत. मी दुसरा ठराव, सुचक श्री. आसिफ शेख यांचा ठराव पहिला मतास टाकतो मिरा भाईंदर महानगरपालिकेचे विद्यमान सदस्य मा. श्री. परशुराम दामोदर पाटील यांचे आज दि. २०/०८/२०११ रोजी दुःखद निधन झाल्याची बातमी सभागृहात कळल्याने संपूर्ण सभागृह त्यांच्या परिवाराच्या दुःखात सहभागी असून परमेश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती देवो व सदगती देवो तसेच या संकटसमयी त्यांच्या परिवारास हे दुःख सहन करण्याची परमेश्वर शक्ती प्रदान करो हीच इश्वरचरणी प्रार्थना तसेच सुरु असलेला सभापटलावरील विषय पुर्ण झाल्यानंतर सभेत त्यांना भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करण्यात व उर्वरीत विषयाकरीता सभा तहकुब करण्यात यावी अशी सुचना मी मांडत आहे. या ठरावाच्या बाजूने असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. या ठरावाच्या विरोधात जे असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. मी पहिली सुचना वाचतो आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकेचे सदस्य श्री. परशुराम पाटील यांचे आज दि. २०/०८/२०११ रोजी १२.३० वाजता दुःखद निधन झाले आहे. तरी त्यांना श्रध्दांजली अर्पण करण्यासाठी आजची सभा तहकुब करावी असा मी ठराव मांडत आहे. या सुचनेच्या बाजूने जे असतील त्यांनी हात वर करायचे आहेत या सुचनेच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत.

**जयंत पाटील (मा. पिठासीन अधिकारी ) :-**

तहकुबीच्या दोन सुचना आलेल्या आहेत त्यातील श्री. नरेंद्र मेहता यांच्या सुचनेला १६ मते पडलेली आहेत आणि श्री. आसिफ शेख यांच्या बाजूने २७ सदस्य आहेत त्यामुळे श्री. नरेंद्र मेहता यांची सुचना फेटाळण्यात येऊन श्री. आसिफ शेख यांची सुचना स्विकारलेली आहे. पुढचा विषय घ्या.

**नरेंद्र मेहता :-**

सचिव साहेब, त्या ठरावामध्ये श्री. आसिफ शेख यांनी जे नमुद केले आहे. त्या ठरावाची शेवटची ओळ तुम्ही वाचा चालू आहे तो विषय पूर्ण करा इतर विषय तहकुब करावे ही शेवटची ओळ आहे. आपण वाचून घ्या आणि तो ठराव मंजूर झाला आहे.

**जयंत पाटील (मा. पिठासीन अधिकारी ) :-**

श्री. परशुराम पाटील यांच्यावर सगळ्यांचे प्रेम आहे. गेली वीस वर्षे ते या सदनात सदस्य म्हणून आहेत. पुढचा विषय घ्या.

**नगरसचिव :-**

सभा पटलावर सुरु असलेला विषय असे म्हटले आहे.

**(सभागृहात गोंधळ)**

**नरेंद्र मेहता :-**

सचिव साहेब, आजची सभा तहकुब झाली म्हणून आम्ही सभागृहाच्या बाहेर पडत आहोत.

**(सभागृहात गोंधळ)**

**सभा तहकुबी ठराव क्र. ५१ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेचे विद्यमान सदस्य मा. श्री. परशुराम दामोदर पाटील यांचे आज दि. २०/०८/२०११ रोजी दुःखद निधन झाल्याची बातमी सभागृहात कळल्याने संपूर्ण सभागृह त्यांच्या परिवाराच्या दुःखात सहभागी असून परमेश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती देवो व सदगती देवो तसेच या संकटसमयी त्यांच्या परिवारास हे दुःख सहन करण्याची परमेश्वर शक्ती प्रदान करो हीच इश्वरचरणी प्रार्थना तसेच सुरु असलेला सभापटलावरील विषय पुर्ण झाल्यानंतर सभेत त्यांना भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करण्यात व उर्वरीत विषयाकरीता सभा तहकुब करण्यात यावी अशी सुचना मी मांडत आहे.

**सुचक :- श्री. आसिफ शेख** **अनुमोदक :- श्री. भगवती शर्मा**

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात |
|---|---|---|---|
| १ | मॉरस जोसेफ रॉड्रीक्स | १ | मेहता नरेंद्र लालचंद्र |
| २ | शेट्टी गणेश गोपाळ | २ | वर्षा गिरधर भानुशाली |

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | व्यास सुधा वासुदेव | ३ | सिंह मदन उदितनारायण |
| ४ | नयना गजानन म्हात्रे | ४ | म्हात्रे कल्पना महेश |
| ५ | तिवारी दिव्या अशोक | ५ | अग्रवाल ओमप्रकाश गंगाधर |
| ६ | वैती नर्मदा यशवंत | ६ | बाविघर सिसिलीया विजय |
| ७ | पाटील जयंत महादेव | ७ | सिंग श्रीप्रकाश जिलेदार |
| ८ | म्हात्रे राजेश हरिश्चंद्र | ८ | पांडे स्नेहा शैलेश |
| ९ | पाटील ध्रुवकिशोर मन्साराम | ९ | दुबे रामनारायण सदानंद |
| १० | पाटील मिलन गोविंदराव | १० | यादव मिरादेवी रामलाल |
| ११ | फॅरो ग्रिटा स्टिफन | ११ | पाटील प्रविण मोरेश्वर |
| १२ | शेख आसिफ गुलाब | १२ | पाटील अनंत रामचंद्र |
| १३ | हेलन गोविंद जॉर्जी | १३ | पालांडे प्रशांत भगवंतराव |
| १४ | बर्नड अल्बर्ट डिमेलो | १४ | गावंड मंदाकिनी आत्माराम |
| १५ | परेरा कॅटलीन ॲन्थोनी | १५ | म्हात्रे मोहन गोपाळ |
| १६ | ठाकूर प्रकाश पांडूरंग | १६ | पाटील संध्या प्रफुल्ल |
| १७ | मेन्डोन्सा स्टिवन जॉन | १७ | मिलन वसंत म्हात्रे |
| १८ | डॉ. राजेंद्र भवरलाल जैन | | |
| १९ | शर्मा भगवती तुगनचंद | | |
| २० | पाटील वंदना मंगेश | | |
| २१ | चक्रे वंदना रामदास | | |
| २२ | माळी हेमा रविंद्र | | |
| २३ | हसनाळे ज्योत्स्ना जालींदर उर्फ शिंदे पूजा प्रताप | | |
| २४ | अनिता जयवंत पाटील | | |
| २५ | टेरी पॉल परेरा | | |
| २६ | भोईर राजु यशवंत | | |
| २७ | जाधव मोहन महादेव | | |

**ठराव बहुमताने मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ४८, मिरा भाईंदर महानगरपालिकामधील प्रभाग क्र. २७ च्या पालिका सदस्य सौ. नयना गजानन म्हात्रे यांचे अनर्हते बाबतचे प्रकरण मा. न्यायाधीशाकडे (वरिष्ठ स्तर दिवाणी न्यायालय, ठाणे) पाठविण्यासाठी निर्णय घेणे.

**मिलन पाटील :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सन २००२ च्या सार्वत्रिक निवडणूकीद्वारे सौ. नयना गजानन म्हात्रे यांची दि. २८/८/२००२ ते २७/८/२००७ पर्यंत नगरसेविका म्हणून निवड झाली होती. तद्नंतर मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सन २००७ च्या सार्वत्रिक निवडणूकीद्वारे प्रभाग क्र. २७ साठी सौ. नयना गजानन म्हात्रे यांची दि. २८/८/२००७ रोजी नगरसेविका म्हणून नेमणूक झालेली आहे.

तक्रारदार श्री. अरविंद एस गुप्ता यांनी मौजे मुर्धा, तलाठी सजा भाईदर, सर्व्हे क्र. ३६ जुना, सी.टी.एस.नं १११ या शासकिय जागेवर तळ अ १ मजल्याचे अनधिकृत बांधकाम सौ. नयना म्हात्रे व त्यांचे पती श्री. गजानन म्हात्रे यांनी केल्यामुळे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम चे कलम १०(१ड) नूसार सौ. नयना म्हात्रे यांचे नगरसेवक पद रद्द करण्याची मागणी केली आहे. सदर तक्रारींच्या अनुषंगाने तत्कालीन आयुक्त यांनी तक्रारदार श्री. अरविंद गुप्ता व नगरसेविका सौ. नयना गजानन म्हात्रे यांचे म्हणणे ऐकून घेण्यासाठी सुनावणी आयोजित करून त्यांनी सादर केलेल्या कागदपत्रांचा अभ्यास करून दि. १९/५/२०११ रोजी सौ. नयना म्हात्रे यांचे महापालिका सदस्य म्हणून पद धारक करण्याचे अधिकार बंद झाल्याबाबतचे प्रकरणात निर्णय घेणेचा अधिकार न्यायाधिशास असल्याने मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम चे कलम १२ अन्वये सदर अनर्हतेबाबतचे प्रकरण मा. न्यायाधीशाकडे (वरिष्ठ स्तर दिवाणी न्यायालय, ठाणे) पाठविण्यासाठी निर्णय घेण्यास मा. महासभेपुढे ठेवण्यास आदेश पारीत केले आहेत. सदर आदेशात तत्कालीन आयुक्त यांनी मौजे मुर्धा, सी.टी.एस.नं. १११ या सरकारी जागेत सौ. नयना म्हात्रे यांनी यांच्या नावे कर आकारणी केलेले बांधकाम विभागीय कार्यालय राई-मुर्धा यांच्या अहवालान्वये सदरची मालमत्ता सन १९९५

पूर्वीचे असल्याचे दिसून येत असून सौ. नयना म्हात्रे सन २००२-२००७ व २००७-२०१२ पर्यंत नगरसेविका म्हणून निवडून आल्या आहेत. त्यामुळे सदरचे बांधकाम त्या नगरसेविका असताना केल्याचे सकृत दर्शनी सिध्द होत नाही असे नमुद केले आहे. तसेच मौजे मुर्धा, सर्व्हे क्र. ३६ या जागेवरील श्री. गजानन म्हात्रे यांच्या नावे असलेली मालमत्ताचे बांधकाम सौ. नयना गजानन म्हात्रे यांचे पती श्री. गजानन म्हात्रे यांनी कधी बांधलेले आहे याचा पुरावा तक्रारदार यांनी सादर न केल्यामुळे सौ. नयना म्हात्रे यांनी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरित्या सदरचे बांधकाम नगरसेविका पदी असताना केले असल्याचे सकृत दर्शनी सिध्द झालेले नाही.

तरी वरील नमुद केलेले बांधकाम सौ. नयना गजानन म्हात्रे यांनी नगरसेवक पदी असताना केले आहे असे स्पष्ट सिध्द न झाल्यामुळे, या प्रकरणी कार्यालयीन अहवाल पाहता व चर्चेअंती सदरच्या प्रकरणात कारवाई करणेसाठी ही सभा सदरचा प्रस्ताव नामंजूर करीत आहे.

**वंदना चक्रे :-**

याला माझे अनुमोदन आहे.

**जयंत पाटील (मा. पिठासीन अधिकारी ) :-**

प्रकरण क्र.४८, सर्वानुमते...........

**मिलन म्हात्रे :-**

सर्वानुमते नाही माझा विरोध आहे तसेच यापूर्वीच्या विषयाला पण माझा विरोध आहे. मी थोडा लेट झालो.

**जयंत पाटील (मा. पिठासीन अधिकारी ) :-**

त्यावेळी तुम्ही सभागृहात नव्हते.

**मिलन म्हात्रे :-**

मान्य आहे पण या विषयावर मला बोलायचे आहे.

**जयंत पाटील (मा. पिठासीन अधिकारी ) :-**

या विषयावर तुम्ही विरोध नोंदवू शकता.

**मिलन म्हात्रे :-**

विरोध नोंदवून मला बोलायचे आहे.

**जयंत पाटील (मा. पिठासीन अधिकारी ) :-**

सदरचा ठराव सर्वानुमते मंजूर.

**मिलन म्हात्रे :-**

तुमचा मंजूर झाला आहे. परंतु श्री. शिवमुर्ती नाईक यांचा २००३ चा सर्व्हे आहे. याच्यामध्ये अहवाल आहे. या अहवालाला या ठरावाने धुडकावले त्याचा कुठलाही विचार केला नाही. त्याच्यामध्ये क्लीअर कट लिहीले आहे की, अनधिकृत बांधकाम तोडण्यास बाधा न येता, याची नोंद करुन घ्यावी, मा. आयुक्तांनी आपल्या पॉवरमध्ये नगरसेवक पद रद्द करण्याचा प्रयत्न करावा.

**आसिफ शेख :-**

सन्मा. पिठासीन अधिकारी सुचक श्री. मिलन पाटील आणि अनुमोदन श्रीम. वंदना चक्रे यांनी ठराव मांडलेला आहे. ठराव मंजूर झालेला आहे त्यांचा विरोध नोंदविण्यात आलेला आहे आणि ज्याप्रमाणे मी सुचना केलेली आहे की, विषय पटलावरील विषय करुन सभा तहकुब करावी. तर आत्ता श्रध्दांजली वाहून सभा तहकुब करण्यास हरकत नाही.

**प्रकरण क्र. ४८ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकामधील प्रभाग क्र. २७ च्या पालिका सदस्य सौ. नयना गजानन म्हात्रे यांचे अनर्हते बाबतचे प्रकरण मा. न्यायाधीशाकडे (वरिष्ठ स्तर दिवाणी न्यायालय, ठाणे) पाठविण्यासाठी निर्णय घेणे.

**ठराव क्र. ५२ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सन २००२ च्या सार्वत्रिक निवडणूकीद्वारे सौ. नयना गजानन म्हात्रे यांची दि. २८/८/२००२ ते २७/८/२००७ पर्यंत नगरसेविका म्हणून निवड झाली होती. तद्नंतर मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सन २००७ च्या सार्वत्रिक निवडणूकीद्वारे प्रभाग क्र. २७ साठी सौ. नयना गजानन म्हात्रे यांची दि. २८/८/२००७ रोजी नगरसेविका म्हणून नेमणूक झालेली आहे.

तक्रारदार श्री. अरविंद एस गुप्ता यांनी मौजे मुर्धा, तलाठी सजा भाईंदर, सर्व्हे क्र. ३६ जुना, सी.टी.एस.नं. १११ या शासकिय जागेवर तळ अ १ मजल्याचे अनधिकृत बांधकाम सौ. नयना म्हात्रे व त्यांचे पती श्री. गजानन म्हात्रे यांनी केल्यामुळे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम चे कलम १०(१ड) नूसार सौ. नयना म्हात्रे यांचे नगरसेवक पद रद्द करण्याची मागणी केली आहे. सदर तक्रारींच्या अनुषंगाने तत्कालीन आयुक्त यांनी तक्रारदार श्री. अरविंद गुप्ता व नगरसेविका सौ. नयना गजानन म्हात्रे यांचे म्हणणे ऐकून घेण्यासाठी सुनावणी आयोजित करून त्यांनी सादर केलेल्या कागदपत्रांचा अभ्यास करून दि. १९/५/२०११ रोजी सौ. नयना म्हात्रे यांचे महापालिका सदस्य म्हणून पद धारक करण्याचे अधिकार बंद झाल्याबाबतचे प्रकरणात निर्णय घेणेचा अधिकार न्यायाधिशास असल्याने मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम चे कलम

१२ अन्वये सदर अनर्हतेबाबतचे प्रकरण मा. न्यायाधीशाकडे (वरिष्ठ स्तर दिवाणी न्यायालय, ठाणे) पाठविण्यासाठी निर्णय घेण्यास मा. महासभेपुढे ठेवण्यास आदेश पारीत केले आहेत. सदर आदेशात तत्कालीन आयुक्त यांनी मौजे मुर्धा, सी.टी.एस.नं. १११ या सरकारी जागेत सौ. नयना म्हात्रे यांनी यांच्या नावे कर आकारणी केलेले बांधकाम विभागीय कार्यालय राई-मुर्धा यांच्या अहवालान्वये सदरची मालमत्ता सन १९९५ पूर्वीचे असल्याचे दिसून येत असून सौ. नयना म्हात्रे सन २००२-२००७ व २००७-२०१२ पर्यंत नगरसेविका म्हणून निवडून आल्या आहेत. त्यामुळे सदरचे बांधकाम त्या नगरसेविका असताना केल्याचे सकृत दर्शनी सिध्द होत नाही असे नमुद केले आहे. तसेच मौजे मुर्धा, सर्व्हे क्र. ३६ या जागेवरील श्री. गजानन म्हात्रे यांच्या नावे असलेली मालमत्ताचे बांधकाम सौ. नयना गजानन म्हात्रे यांचे पती श्री. गजानन म्हात्रे यांनी कधी बांधलेले आहे याचा पुरावा तक्रारदार यांनी सादर न केल्यामुळे सौ. नयना म्हात्रे यांनी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरित्या सदरचे बांधकाम नगरसेविका पदी असताना केले असल्याचे सकृत दर्शनी सिध्द झालेले नाही.

तरी वरील नमुद केलेले बांधकाम सौ. नयना गजानन म्हात्रे यांनी नगरसेवक पदी असताना केले आहे असे स्पष्ट सिध्द न झाल्यामुळे, या प्रकरणी कार्यालयीन अहवाल पाहता व चर्चेअंती सदरच्या प्रकरणात कारवाई करणेसाठी ही सभा सदरचा प्रस्ताव नामंजूर करीत आहे.

**सुचक :- श्री. मिलन पाटील** **अनुमोदक :- सौ. वंदना चक्रे**

**ठराव बहुमताने मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

सर्वांनी दोन मिनिटे जागेवर उभे राहून मृतात्म्याला श्रद्धांजली वाहायची आहे.

**जयंत पाटील (मा. पिठासीन अधिकारी ) :-**

आजची सभा तहकुब करण्यात येत आहे. सभागृहाला पुढच्या सभेची वेळ आणि तारीख कळविण्यात येईल.

**सभा तहकुब झाल्याची वेळ :- दु. १.०५ वा.**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**